# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड


| | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | इ-मेल nandedrdc@gmail.com |
| दुरध्वनी - ०२४६२ - २३५०७७ | फॅक्स § ०२४६२-२३८५०० |


जा.क्र.२०२०/मशाका-१/आस्था २/ सीआर-३० दि ०८/१२/२०२०

**प्रति,**

उपविभागीय अधिकारी,

किनवट.

**विषय** - तलाठी पदभरती २०१९ .

**संदर्भ** - १. सहसचिव महसुल व वनविभाग यांचे पत्र क्र. पभमा- २०२०/प्र.क्र. ११९/ई-१० दि.०२/१२/२०२०.

२. आपला दि. २८.०५.२०२० रोजीचा पेसा क्षेत्र अंतर्गत उमेदवारांनी सादर केलेल्या मुळ अभिलेखाची तपासणीबाबचा अहवाल.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र व आपल्या अहवालान्वये महापरीक्षा पोर्टल मार्फत नांदेड जिल्ह्यातील तलाठी पदभरती २०१९ करीता महापरीक्षा पोर्टलवर अर्ज केलेल्या उमेदवारांची परीक्षा दि.०२.०७.२०१९ ते दि.२६.०७.२०१९ या कालावधीत घेण्यात आलेली आहे. महापरीक्षा पोर्टल मार्फत उपलब्ध डाटावरुन नांदेड जिल्ह्यातील तलाठी पदभरती २०१९ अंतर्गत मुळ कागदपत्र तपासणीअंती, व आपण दि. २८.०५.२०२० रोजी पेसा अंतर्गत पात्र उमेदवार यांनी सादर केलेल्या महसुली पुराव्याची सत्यता पडताळणीबाबच्या अहवालानुसार, जिल्हा निवड समितीची बैठक घेवुन शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं-१२१६/(प्र.क्र. ६५/१६)/१३-अ दि १३ जुन, २०१८ व शासन निर्णय क्र.बीसीसी -२०१८/प्र.क्र.५८१ ए/१६-ब दि.०४ जुलै २०१९ मधील तरतुदीनुसार पेसा अंतर्गत तलाठी पदाची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी अंतिम करुन प्रसिध्द करण्यात आली.

आपल्याकडे वर्ग करण्यात येत असलेल्या उमेदवारांची सज्जानिहाय नियुक्ती करतांना संबंधितांकडुन लेखी पसंतीक्रम घेवून, गुणानुक्रमे नियुक्तीची कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

तसेच पेसा अंतर्गत तलाठी पदासाठी अंतिम निवड यादीतील उमेदवार आपणाकडे वर्ग करण्यात येत आहेत. अंतिम निवड यादीनूसार निवड केलेल्या उमेदवारांना खालील अटीस तसेच तलाठी भरती नियमावलीतील तरतुदी, जात प्रमाणपत्र याबाबतचे नियम विचारात घेवुन नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी.आपल्याकडे वर्ग केलेल्या उमेदवारांचा तपशिल यासोबतचा आदेशामध्ये देण्यात आला आहे.

१) निवड केलेल्या उमेदवारांना मुळ कागदपत्रे व अर्हता तपासणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश निर्गमीत करुन रुजू करुन घेण्याची कार्यवाही करावी.

२) माजी सैनिक घटकातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्यांनी माजी सैनिक या घटकाचा लाभ घेतलेला नाही याची खात्री जिल्हा सैनिक बोर्डाकडून करुन घ्यावी. तदनंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करावेत.

३) शासन परिपत्रक क्र.अंशका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६ अ दि. १९ सप्टें. २०१३ व शासन परीपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ दि. १६ मार्च १९९९ मधील तरतुदीनुसार अंशकालीन घटकातील उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे.

४) शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र बीसीसी-२०११-प्रक्र-१०६४-२०११-१६-ब दि.१२.१२.२०११ नूसार सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पूरती नियुक्तीचे आदेश निर्गमित करावेत अशा सूचना आहेत. तसेच नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून एक महिण्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीचा प्रस्ताव सर्व संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करने आवश्यक आहे. सदर पावती प्राप्त झाल्यानंतर त्याचा पाठपूरावा कार्यालयाच्या स्तरावरुन करणे आवश्यक आहे. तसेच या निर्णयातील इतर बाबीचीही पूर्तता करावी.

५) तलाठी पदासाठी वर्ग करण्यात आलेले, प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र, खेळाडु उमेदवारावांचे खेळाडु असल्याबाबतचे प्रमाणपत्र व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि अपंग (अल्पदृष्टी व अस्थिव्यंग) उमेदवारांचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र, व माजी सैनिक उमेदवारांचे माजी सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र.त्या त्या घटकनिहाय लाभ घेतलेल्या कार्यालयाकडुन शासकीय नियमानुसार तपासणी केल्यानंतर संबंधितांस नियुक्तीचे आदेश निर्गमीत करावे.

६) निवड केलेल्या उमेदवारांना शासन सेवेतील वरील अटीशिवाय सरळसेवा भरती नियमावलीनुसार सर्व अटी व शर्तीची पूर्तता करून उमेदवारांना नियुक्तीचे आदेश तातडीने निर्गमित करुन डाक नोंदीने पाठवावेत. जर डाक नोंदीचा गोषवारा वेळीच प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार आदेश तामीलीस्तव सर्व संबंधीत तहसिलदारांना पाठवावा आदेश तामील होणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण नियुक्ती आदेश दिलेले उमेदवार नियुक्ती आदेश तामील होवूनही रुजू झाले नाही, तर विहीत केलेला कालावधी संपल्यानंतर प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नियुक्ती देण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावा.

पदस्थापनेचे आदेश तामिल होवुनही अनुपालन अहवाल न पाठविल्यास त्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल. कारण सदर निवड यादी एक वर्षासाठी किंवा निवडसुची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत या पैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील त्यानंतर हि निवडसुची व्यपगत होईल.

वरील कार्यवाही करून अनूपालन अहवाल आठ दिवसाचे आत सादर करावा.

(सोबत - संबंधीताचे अर्ज, तपासणी सुची, अंतिम निवड यादी
व वर्ग करण्याबाबतचा आदेश)

जिल्हाधिकारी नांदेड

१. याची एक प्रत श्री ............................................ रा..................... यांना देवून कळविण्यात येते की, आपण उपविभागीय अधिकारी किनवट यांचेशी संपर्क साधावा.

निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड

# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड


| वेब साईट - www.nanded.gov.in | इ-मेल nandedrdc@gmail.com |
|---|---|
| दुरध्वनी - ०२४६२ - २३५०७७ | फॅक्स - ०२४६२-२३८५०० |


जा.क्र.२०२०/मशाका-१/आस्था २/ सीआर-३०

दि. ०८/१२/२०२०

**आदेश**

महापरीक्षा पोर्टल मार्फत नांदेड जिल्ह्यातील तलाठी पदभरती २०१९ करीता महापरीक्षा पोर्टलवर अर्ज केलेल्या उमेदवारांची परीक्षा दि.०२.०७.२०१९ ते दि.२६.०७.२०१९ या कालावधीत घेण्यात आलेली आहे. परीक्षेअंती निवड करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांची मुळ कागदपत्र तपासणीअंती अंतिम निवड यादी तयार करुन खालीलप्रमाणे पेसा क्षेत्र अंतर्गत अनुसुचीत जमाती उमेदवार आपल्याकडे उपविभागीय कार्यालयात वर्ग करण्यात येत आहे.

**पेसा क्षेत्र अंतर्गत अनुसुचीत जमाती उमेदवार**

| अ.क्र. | अंतिम यादीत निवड झालेल्या उमेदवाराचे नाव | प्राप्त गुण | पेसा अंतर्गत निवडीचा प्रवर्ग समांतर आरक्षणास |
|---|---|---|---|
| १. | VIKRAM BABULAL CHOUDHARI | १६० | अनु.जमाती (सर्वसाधारण) |
| २. | DAYANAND LAXMAN YERDLAWAR | १६० | अनु.जमाती (सर्वसाधारण) |
| ३. | ADINATH KISHAN DUKARE | १५८ | अनु.जमाती (सर्वसाधारण) |
| ४. | VISHAL LASMAYYA SATLAWAR | १४६ | अनु.जमाती (सर्वसाधारण) |
| ५. | PRADIP JAMBUVANTRAO KADAM | १४४ | अनु.जमाती (सर्वसाधारण) |
| ६. | Puja Panditrao Metkar | १४२ | अनु.जमाती (महिला) |
| ७. | SINDHU NAMDEV ATRAM | १३६ | अनु.जमाती (महिला) |
| ८. | ANUPAMA WAMANRAO PENDOR | १३४ | अनु.जमाती (महिला) |
| ९. | VARSHA PUNDALIK DALKE | १३० | अनु.जमाती (महिला) |
| १०. | SHALAN NAMDEV MENDKE | १३० | अनु.जमाती (महिला) |
| ११. | ANITA VITHOBA KUDMATE | १२८ | अनु.जमाती (महिला) |
| १२. | MEGHSHAM KRUSHNA SANGAVIKAR | १४४ | अनु.जमाती (अंशकालीन) |
| १३. | SHIVSHANKAR DATTA MUKADE | १४२ | अनु.जमाती (अंशकालीन) |

जिल्हाधिकारी नांदेड

१. याची एक प्रत श्री ............................................ रा............................ .....
यांना देवून कळविण्यात येते की, त्यांना **उपविभागीय कार्यालय किनवट** यांचेकडे नियुक्तीसाठी वर्ग केले आहे. त्यांनी **उपविभागीय अधिकारी किनवट** यांचेशी संपर्क साधावा.

- स्वा -

निवासीजिल्हाधिकारी नांदेड